शुक्रवार, २६ ऑक्टोबर २०१८ | सातारा
वर्ष : १५ अंक : २०५ किंमत ४ रू. | पाने १२+४
# पुण्य नगरी
www.epunyanagari.com | Toll Free 9773927928

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

## डी पी. कॉलेजमध्ये आज जिल्हास्तरीय युवा महोत्सव

**कोरेगाव :** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अंतर्गत ३८ वा जिल्हास्तरिय युवा महोत्सव शुक्रवार दि. २६ रोजी येथील डी. पी. भोसले कॉलेजच्या प्रांगणात साजरा होत आहे. महोत्सवाची जोरदार तयारी कॉलेजने केली आहे. शुक्रवार दि. २६ रोजी सकाळी १० वाजता या महोत्सवाचे उद्घाटन डी. पी. भोसले कर्मवीर मंचवर होणार आहे.

हे उदघाटन शिवाजी विद्यापिठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते, रयत शिक्षण संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ.भाऊसाहेब कराळे यांच्या अध्यक्षतेखाली, कोरेगाव एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा सुनिताताई जगताप, पंचक्रोशी शिक्षण मंडळ रहीमतपूरच्या अध्यक्षा चित्रलेखा माने - कदम व धनसिंग कदम याच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.